Page ३/५/१०

te Backache - Kidney Stone.

Chandrakant Sagrekar    Tel No [redacted]

Acute Backache & Kidney Stone (Injury)-

माझं नावं श्री. चंद्रकांत विश्वनाथ सागवेकर, दि. ७/१/२००९ रोजी अचानक माझ्या पोटात फार दुखु लागले मला हॉलिस्पिरीट हॉस्पिटलमध्ये भरती करण्याची वेळ आली. हॉलिस्पिरीटमध्ये माझ्या पोटाची सोनोग्राफी करण्यात आली. सोनोग्राफीच्या रिपोर्टमध्ये माझ्या उजव्या बाजुच्या किडणीमध्ये 6 mm साईजच्या कीडणी स्टोन दाखवण्यात आला. हॉस्पिटलच्या डॉक्टरांनी मला हॉस्पिटलमध्ये भरती होऊन किडणी स्टोनवर उपचार करण्यास सांगितले परंतु मी तिथे उपचार केला नाही घरी येऊन मी विचार केला आणि मला डॉक्टर सुनिल मेहरा, साहेब यांची आठवण आली. कारण त्यांना मी पुर्वीपासुन ओळखत होतो. मी डॉक्टरांना माझा रिपोर्ट दाखवला आणि मला सांगितले तुम्ही काही काळजी (चिंता) करु नका तुमच्या किडणी स्टोन मी फक्त ३ ते 4 महिन्यांत पाडुन तुमचा आजार बरा करीन हे शब्द ऐकुनचं माझा अर्धा आजार बरा झाल्यासारखे वाटले. डॉक्टरांनी माझ्यावर उपचार चालु केले आणि चार (4) महिन्यांत डॉक्टरांनी अशी जादु केल्यासारखे झाले माझ्या किडणीचा स्टोन त्यांच्या औषधाने गळुन पडला (विरघळुन). औषधउपचारां नंतर मी सोनोग्राफी व KUB X ray केले त्यांत माझे सर्व रिपोर्ट Normal आले.

तसेच वरील उपचार करत असतानाच मार्च-2010 मध्ये अचानक माझ्या कमरेत चमक भरली मी अंथ अंथरुनाला (बेडवर) पडुन राहिलो उठता येत नव्हते बसता येत नव्हते. ॲलोपॅथिक उपचार

See below Next page

सुरु केले इंजेक्शन, औषध घेतली पण काहिही फरक पडला नाहि. नंतर डॉक्टर साहेबांना ही बातमी कळवली. तेव्हा डॉक्टरांनी सांगितले मी ऑपरेशन सांगत नाहि ऑपरेशन बेडवर झोपुन रहावे व त्यांनी स्वतः कडील औषध सुरु केले त्यांच्या सल्ल्याप्रमाणे मी वागु लागलो आणि त्यांनी मला ५ दिवसां पासुन आराम पडत गेला आणि १५ दिवसांत मी पुर्ण पणे बरा झालो आणि आता मी व्यवस्थित प्रवास करु लागलो.

डॉक्टरांविषयी लिहायचं झालं तर मी हे सांगेन की इथे येणाऱ्या कोणत्याहि पेशंटनी डॉक्टर सांगतील व त्याप्रमाणे औषध घेतली व पथ्य पाळली तर तुमचा कोणताहि आजार काही दिवसांत बरा होऊ शकतो.

माझ्यावर उपचार सुरु असताना मी शाकाहारी जेवण जेवत होतो. असे डाळ, भात, भाजी, काकडी, गाजर, बीट, उकडलेला बटाटा, बटाट्याचा रस वगैरे तसेच मांसाहारी जेवण असे मटण, चिकन, मासे यांसी बाहेर हॉटेलमधील खाणे दारु पिणे, चहा पिणे, कॉफी दुध ह्या सर्व गोष्टी मी वरील उपचारा दरम्यान बंद ठेवल्या होत्या.

तसेच डॉक्टर सुनिल मेहरांच्या क्लिनिकमधील कंपाउंडर अगदी जबाबदारीने आपली काम करताना दिसतात. पेशंट व्यवस्थित औषध घेतात की नाहि याची विचारपुस करतात, पेशंटना औषध घेण्यासाठी व्यवस्थित समजावुन सांगताना दिसतात. फोनवर व्यवस्थित वागणुक देतात. व पेशंटशी विनम्रपणे वागतात.

धन्यवाद!

आपला,

Dagvekar 3/4/2010.

(श्री. चंद्रकांत विश्वनाथ सागवेकर)

Scanned by CamScanner